नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०६/२०२६ (गुरूवार )

## मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलिसांची व्यापक तयारी शांतता समिती बैठका, दंगा नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक आणि रूट मार्च संपन्न

यावर्षी मोहरम दिनांक १७/०६/२०२६ ते २६/०६/२०२६ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. मोहरम ची सांगता दिनांक २६/०६/२०२६ रोजी होणार आहे. त्या दिवशी ताबूत, सवारी, पंजे, डोले इत्यादीचे विसर्जन मिरवणुक काढण्यात येतात. सदर मिरवणुकीत हिंदु—मुस्लिम लोकं मोठया प्रमाणावर सहभाग घेतात. दिनांक २६/०६/२०२६ रोजी असलेला मोहरम सण शांततापूर्ण, सुरक्षित व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडावा यासाठी नागपूर ग्रामीण जिल्हयात व्यापक नियोजन करण्यात आले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तसेच पेट्रोलिंग बंदोबस्त, स्ट्रायकिंग बंदोबस्त, सर्व्हेलन्स व्हॅन बंदोबस्त तसेच राखीव बंदोबस्त असा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**शांतता समिती बैठका:**— मोहरम सणाच्या अनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभाग व पोलीस स्टेशन स्तरावर शांतता समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या. बैठकींना विविध धर्मीय समाजांचे पदाधिकारी, मोहरम उत्सव मंडळांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच शांतता समिती सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बैठकीदरम्यान ध्वनिक्षेपक नियम तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मोहरम मिरवणुकांचे मार्ग, वेळापत्रक, स्वयंसेवकांची नियुक्ती, वाहतूक व्यवस्थापन, आपत्कालीन परिस्थितीतील

समन्वय तसेच सोशल मीडियावरील अफवा आणि आक्षेपार्ह संदेशांपासून दूर राहण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

दंगा नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक (मॉक ड्रील) आणि रूट मार्च :— दिनांक २०/०६/२०२६ रोजी उमरेड शहरातील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला. सदर रूटमार्च उमरेड ते भिसी नाका चौक ते इतवारी मार्केट ते आझाद चौक—जिवन विकास चौक ते  पोलीस स्टेशन उमरेड पर्यत घेण्यात आला. रूट मार्च नंतर आझाद चौक, उमरेड येथे मॉकड्रिल घेण्यात आली. दिनांक २५/०६/२०२६ रोजी काटोल शहरातील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला. सदर रूटमार्च हा पोलीस स्टेशन ते आंबेडकर चौक, पटेल बिल्डींग , सरस्वती नगर, चौबे लेआउट ,सरस्वती नगर, नेहरू बाजार, ते पोलीस स्टेशन पर्यंत घेण्यात आला. रूट मार्च नंतर आंबेडकर चौक, काटोल येथे मॉकड्रिल घेण्यात आली.

मॉकड्रिल दरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी दंगल नियंत्रण साहित्य, सुरक्षा उपकरणे तसेच शस्त्रसामग्रीसह विविध परिस्थितींवर नियंत्रण मिळविण्याचा सराव केला. सदर मॉकड्रिलद्वारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ढाल ,लाठी, हेल्मेट सह सज्ज होवुन आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देणे, प्रात्यक्षिकादरम्यान जमाव नियंत्रण, जमावाला सूचना देऊन पांगविणे, बॅरिकेड्सचा वापर, सशस्त्र कवायत, तसेच जखमी नागरिक व पोलीसांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षितस्थळी हलविणे आदी विविध बाबींचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

यावेळी नागरिकांनी सणोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले.


PATIENT TRANSPORT
AMBULANCE


अंबिका









# शांतता समिती बैठका





# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३० लाख ५२ हजरांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** दिनांक २५/०६/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी महसुल चौकी, भिवापुर येथे नाकाबंदी केली असता अशोक लेलँन्ड टिप्पर क्रमांक एम एच ४० डी सी ३६७८ मिळून आल्याने वाहन थांबवुन पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे आढळून आले. वाहन चालकास रेती परवान्याबाबत विचारणा केली असता त्याकडे ९ ब्रास रेती वाहतुकीचा परवाना होता. सदर वाहन विहित क्षमतेपेक्षा अधिक तसेच परवान्यापेक्षा अधिक रेतीची वाहतूक करत असल्याचा संशय निर्माण झाल्याने सदर वाहनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करून सदर वाहनाचे वजन करण्यात आले. तपासणीनंतर सदर वाहनात परवान्यापेक्षा १.५६ ब्रास अतिरिक्त रेती तसेच विहीत क्षमतेपेक्षा जास्त रेती असल्याचे निष्पन्न झाले.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक टिप्पर क्रमांक एम एच ४० डी सी ३६७८ किंमती ३०,००,०००/— रूपये आणि १०.५६ ब्रास रेती किंमती ५२,५००/— रूपये असा एकुण किमती ३०,५२,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी १) चालक आरोपी किशोर नरेश शिवणकर, वय ३४ वर्षे, रा. महाजन वाडी , हिंगणा जि नागपुर आणि २) वाहन मालक शेखर लक्ष्मण भोंदले, वय ३३ वर्षे, रा. पाचगाव, ता. भिवापुर जि. नागपुरयांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## ४८ तासाच्या आत कंपनीतील चोरीचा गुन्हा उघड,
## एकुण १७ हजार २७० रूपयांचा मुद्देमाल जप्त,२ आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २४/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी बोरी येथील **कंपनीतील चोरीच्या गुन्हयाची ४८ तासाच्या आत उकल केली आहे.**

स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथक उघड न झालेल्या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर

ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून सदर गुन्हयातील **आरोपी क्रं १) विशाल नारायण इंगळे, वय २२ वर्ष, रा. हरिओम नगर टाकळघाट, ता हिंगणा, जि नागपुर २) निकेश हरिचंद नेवारे, वय ३० वर्ष, रा हरिओमनगर टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर यांना दिनांक २४/०६/२०२६ रोजी टाकळघाट परिसरातून ताब्यात घेतले**. नमुद आरोपी यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी त्यांनी एमआयडीसी बोरी येथील नाशिक ऑटो एन्सीलरीज कंपनी (amma) मध्ये दिनांक २२/०६/२०२६ चे रात्री ३.०० वा ते ३.३० वा त्यांचा अजुन एक साथीदार याचेसह कंपनी परिसरात प्रवेश करुन कंपनीतील लोखंडी स्क्वेअर पाईपचे (क्रॉस मेंगरस), पोलचे, सी एँगलचे व पट्टीचे तुकडे असे एकुण ९ नग वजन अंदाजे १७५ किलो चोरी केल्याची माहीती दिली. **अवघ्या ४८ तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाची उकल केली आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) लोखंडी स्क्वेअर पाईपचे (क्रॉस मेगरस), पोलचे व सी एंगलचे एकुण ९ तुकडे वजन १७५ किलो किंमती १७,२७०/—रूपये पाईप असा एकुण १७,२७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**



## विहीत क्षमतेपेक्षा जास्त रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परविरुद्ध कारवाई पारशिवणी पोलीसांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयात दंडात्मक कार्यवाहीसाठी पाठवलेल्या प्रस्तावावरून ६० हजार ५०० रूपये दंड वसुल

पोलीस स्टेशन पारशिवणी:— पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत दिनांक २४/०६/२०२६ रोजी पारशिवणी पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान सावनेर—आमडी फाटा रोडवर रेतीची वाहतूक करणारा टिप्पर क्र. एम एच ४० सीटी १२०७ मिळुन आला. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे आढळून आले. सदर वाहन विहित क्षमतेपेक्षा अधिक रेतीची वाहतूक करत असल्याचा संशय निर्माण झाल्याने सदर वाहनाचे वजन करण्यात आले. वजन तपासणीत सदर टिप्परचे एकूण वजन ५४,९३० किलोग्रॅम असल्याचे निदर्शनास आले. वाहन हे विहीत क्षमतेपेक्षा अधिक रेतीची वाहतूक करत असल्याचे तपासणीत निदर्शनास आले.

पारशिवणी पोलीसांनी पुढील टिप्पर क्र. एम एच ४० सीटी १२०७ वर दंडात्मक कारवाई कामी प्रादेशिक परिवहन अधिकारी ,नागपुर यांचे कार्यालयास पत्र दिले त्यावरून टिप्पर वाहनाविरुद्ध प्रादेशिक परिवहन विभागामार्फत नियमानुसार कारवाई करण्यात आली असून संबंधित टिप्पर मालकाकडून एकूण ६०,५००/— रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :— दिनांक २४/०६/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, सुकळी बेलदा शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे एमआयडीसी बोरी पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२

ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) साहील दिलीप लोनारे, वय २२ वर्षे, रा. बुटीबोरी क्रांती चौक, वार्ड क्र ०५, ता. जि नागपुर २) आदित्य महादेव मोहुर्ले, वय २४ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०४, ता. जि नागपुर ३) जावेद जब्बार शेख, वय २६ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०३, ता. जि नागपुर ४) अजित महबुब शेख, वय ४० वर्षे, रा. टेंभरी, ता. हिंगणा. जि नागपुर ५) इजाज बुलाम शेख, वय ३७ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०१, ता जि नागपुर ६) प्रभु नामदेव खरकाटे, वय २८ वर्षे, रा. बुटीबोरी, वार्ड क्र ०६, जि नागपुर ७) फिरोज अजिज मालदारी, वय ३६ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०४, ता. जि नागपुर ८) प्रफुल रूपगिर गिरी, वय २८ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०२, ता जि नागपुर ९) हेमंत अशोकराव पवार, वय २४ वर्षे, रा. बुटीबोरी वार्ड क्र ०३, ता जि नागपुर** यांना जागीच ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना पकडले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून १) ५२ तासपत्ते व रोख रक्कम २६०१०/— रूपये असा एकुण २६०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक २४/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू असा एकुण १६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी १) महेंद्र कुमार पुसाम, वय ४२ वर्ष, रा. अहमदपुर मध्यप्रदेश ह.मु. कोंढाळी २) महेश रामभरोस परते, रा बिचा, जि मंडला, ह. मु कोंढाळी, धुरखेडा रोड ता. काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी विनोद वासुदेव सहारे, वय ३२ वर्ष, रा. चिरव्हा ता. मौदा याचेवर

१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी शिवचंद्र सोमाजी खाडके, वय ६० वर्ष, रा. विरशी, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी १) राजकुमार तारासिंग उईके, वय ३२ वर्ष, रा. खमारा पोस्ट बंजारा, ता. घनसोर, जि. शिवनी (म.प्र) २) प्रमोद कमलु परतेई, वय ३० वर्ष, रा. बरबटाई, ता. लखनादौन, जि. शिवनी (म.प्र) यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३४२० मिली देशी दारू असा एकुण १६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने